**प्रेस नोट दिनांक २२/०५/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**'' रिक्षा चालकाने प्रवाशाची विसरलेली पैशाची पर्स परत केली. ''**

महिला नामे सौ. शैलेजा प्रदीप पारकर, व त्यांचे पती प्रदीप पारकर रा. स्वारगेट पुरग्रस्त वसाहत, कॉलनी नं. ७१/८ - अ, पर्वती दर्शन, पुणे हे सामान खरेदी करीता लक्ष्मी रोड, पुणे या परिसरात आले होते. ते सामानाची खरेदी झाल्यानंतर बेलबाग चौकातुन त्यांचे घराकडे जाण्यासाठी एका रिक्षातुन गेले. रिक्षा घराजवळ गेल्यानंतर त्यांनी रिक्षातल इतर सामान उतरुन घेतले. परंतु सौ. शैलेजा पारकर यांनी त्यांची पर्स रिक्षात तशीच विसरली. रिक्षा तेथुन निघुन गेल्यानंतर पर्स रिक्षात विसल्याचे त्यांचे लक्षात आले. त्या बॅगमध्ये त्यांचे नगदी ८०००/- रु. बेन्टेक्स बांगड्या व इतर कागदपत्रे होती. ते घाबरलेल्या अवस्थेत शुक्रवार पेठ पोलीस चौकीत आले. त्यांच्याकडे चौकशी करुन रितसर तक्रार घेण्यात आली. त्यानंतर त्या बेलबाग चौकातुन ज्या पॉईटवरुन रिक्षात बसले होते. तेथील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याचे फुटेज तसेच सदरची रिक्षा ज्या मार्गावरुन गेली. त्या मार्गावरील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे देखिल फुटेज तपासले असता, त्यामध्ये सदर रिक्षाचा नंबर एम.एच.१२/एन. डब्ल्यु/५७६३ असे असल्याचा दिसुन आला. त्यानंतर सदर रिक्षाचे रजिस्ट्रेशन नंबरवरुन नाव, पत्ता व मोबाईल नंबर प्राप्त केला असता, सदरची रिक्षा ही मारुती तुकाराम शेंडकर रा. आंबेगाव पठार स.नं. १६, सदगुरु दर्शन बिल्डींग, पुणे मो.नं. ९७६७१२३०९५ असा असल्याचा प्राप्त झाला. सदर मोबाईल नंबरवर पोलीसांनी फोन करुन, प्रवाशाची पर्स रिक्षात विसरल्याचे त्यांना सांगितले असता, इसम नामे मारुती शेंडकर यांनी सांगितले की, तो त्याचे गावी गेला असुन, त्याने त्याची रिक्षा झाकुन ठेवली आहे. सदर इसम गावावरुन परत आल्यानंतर त्याने त्याची रिक्षा तपासली असता, त्यास रिक्षाचे मागील डिक्की मध्ये एक पर्स मिळुन आली. त्याने तात्काळ पोलीसांशी संर्पक करुन, बॅग रिक्षात असल्याचे सांगितले. त्यावर त्यास पर्स पोलीस स्टेशनला आणुन जमा करणेबाबत सांगण्यात आले. सदर इसमाने त्याचे रिक्षा मिळालेली पर्स पोलीस स्टेशन येथे आणुन हजर केली. सदर वेळी सौ. शैलेजा प्रदीप पारकर, व त्यांचे पती प्रदीप पारकर असे हजर होते. त्यांनी सदर पर्स त्याची असल्याचे सांगितले. तसेच त्या पर्समध्ये ठेवलेले पैसे, बांगड्या तसेच कागदपत्रे बरोबर असल्याचे त्यांनी खात्रीशिर सांगितले.

सदर रिक्षा चालक मारुती शेंडकर यांनी दाखविलेल्या प्रमाणिकपणाचा श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे यांनी पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. त्यावेळी सौ. शैलेजा प्रदीप पारकर, व त्यांचे पती प्रदीप पारकर यांनी पोलीसांचे व रिक्षा चालकांचे आभार मानले.

सदरची कार्यवाही श्री. प्रदीप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोहवा किरण कदम, पोहवा हनुमंत जगताप, पोशि संतोष अनुसे, पोशि विकास बोऱ्हाडे यांचे पथकाने केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे